# सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१७

## जाहिरात क्रमांक -४८/२०१७

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदाच्या ८३३ जागांसाठी दिनांक ६ ऑगस्ट, २०१७ रोजी मुख्य परीी क्षा घेण्यात आली. प्रस्तुत परीक्षेसाठी संबंधित उमेदवारांनीी अर्जात केलेले दावे निकालासाठी विचारात घेण्यात आले आहेत. सदर दाव्यांच्या अनुषंगाने शिफारसपात्र उमेदवारांची पात्रता शासनस्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अधीन राहून सदर परीक्षेचा निकाल **दिनांक ३१ मार्च, २०१८** रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये **पुणे** येथील **श्री. थोरात विशाल अशोक (बैठक क्रमांक PN००८३२८)** हे राज्यात प्रथम आले आहेत. मागासवर्गवारीतून **अहमदनगर** येथील **श्री. हरडे प्रविण राजाराम (बैठक क्रमांक PN०१३०१६)** तसेच महिला वर्गवारीतून **अहमदनगर** येथील **श्रीमती वाळके स्नेहल सुदाम (बैठक क्रमांक PN००५११२)** या राज्यातून प्रथम आल्या आहेत.

३. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

मूळ अर्ज क्रमांक ४३६/२०१७ मधील अंतिम आदेशाच्या अधीन राहून अराखीव (महिला) वर्गवारीचे एक पद रिक्त ठेवण्यात आले आहे.

मूळ अर्ज क्रमांक ४०/२०१८ व मूळ अर्ज क्रमांक ४१/२०१८ या प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार संभाव्य बाधित उमेदवारांची ( Affected candidates) नावे संबंधितांस कळविण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

४. या निवड प्रक्रियेच्या पूर्व परीक्षेस ६९,८४८ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. पूर्व परीक्षेच्या निकाला आधारे पात्र ठरलेल्या ९८७० उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी प्रवेश देण्यात आला होता. प्रस्तुत निकाला आधारे ८३२ उमेदवारांची शिफारस करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत निकालाआधारे शिफारसपात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-क पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा विहित दिनांकाचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहील .

६. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसात, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमून्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्र. ३.८ पहावी)

**दिनांक : ३१ मार्च, २०१८**

**(विजया पडते)**

**ठिकाण- मुंबई**

**उपसचिव,**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**